**महाराष्ट्र शासन**
**वेतनपथक (उच्च शिक्षण)**
**पुणे विभाग, पुणे**
**१७ डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे ४११ ००१**
Web - www.jdhepune.info Email - payunit@jdhepune.info

फोन नं. ०२०/२६१२७८३३, २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०/२६०५१६३२

क्रमांक - वेतन-२०२०/प्राचार्य मान्यता/वेतनपथक, पुणे दिनांक - २४ नोव्हेंबर, २०२०

प्रति,

प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित कला, विज्ञान, वाणिज्य,
विधी, शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये.
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा

**विषय - प्राचार्य पदाच्या मान्यतेची माहिती सादर करणेबाबत.**

सध्याच्या प्रचलीत शासन धोरणानुसार अशासकीय महाविद्यालयांमध्ये नियमीत प्राचार्य पदावरील नियुक्तीस ५ वर्षासाठी आणि प्रभारी प्राचार्य पदावरील नियुक्तीस ०१ वर्षासाठी अकृषी विद्यापीठांकडून मान्यता देण्यात येते. सदरहू कालावधी संपल्यानंतर पुन्हा नव्याने मान्यता घेणे आवश्यक आहे. परंतू या कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, महाविद्यालयांमध्ये ज्या प्राचार्यांची नियमीत प्राचार्य म्हणून ५ वर्षासाठी आणि प्रभारी प्राचार्य म्हणून एक वर्षासाठी विद्यापीठांकडून मान्यता देण्यात आलेली आहे तो कालावधी संपूनदेखील पुन्हा नव्याने मान्यता घेण्यात आलेली नाही. ही बाब अंतिशय गंभीर आहे.

तरी या पत्राद्वारे आपणास कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयामध्ये ज्या प्राचार्यांची मान्यता संपलेली आहे त्यांनी पुन्हा नव्याने मान्यता घेण्याबाबत तात्काळ कार्यवाही करुन माहे डिसेंबर, २०२० ची वेतन देयकासोबत सुधारित मान्यतेची प्रत जोडण्यात यावी.

प्रसंगतः असेही कळविण्यात येते की, यापुढे ज्या नियमीत व प्रभारी प्राचार्यांची मान्यतेची मुदत संपण्यापूर्वी याबाबत योग्य ती कार्यवाही संबंधीत महिन्यांचे वेतन देयक सादर करण्यापूर्वी करावी म्हणजे आपले वेतन अनुदान दरमहा वितरीत करण्याबाबत कोणतीही अडचण निर्माण होणार नाही.

(डॉ. मोहन खताळ)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे